प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

मे 16, 2016

**शताब्दी महिला सहकारी बँक लि., ठाणे, जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र ह्यांना दिलेल्या निदेशांना आरबीआयकडून नोव्हेंबर 17, 2016 पर्यंत मुदतवाढ**

भारतीय रिझर्व बँकेने अधिसूचित केले आहे की, शताब्दी महिला सहकारी बँक लि., ठाणे ह्यांना, ऑगस्ट 14, 2014 रोजीच्या निदेशान्वये, ऑगस्ट 20, 2014 रोजीचे व्यवहार बंद झाल्यापासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी निदेशाखांली ठेवण्यात आले होते. वरील निदेशांची वैधता, निदेश दि. फेब्रुवारी 4, 2015, दि. जुलै 21, 2015 आणि दि. नोव्हेंबर 4, 2015 अन्वये अनुक्रमे सहा महिन्यांसाठी, तीन महिन्यांसाठी व सहा महिन्यांसाठी वाढविण्यात आली होती. जनतेच्या माहितीसाठी येथे अधिसूचित करण्यात येते की, निदेश दि. फेब्रुवारी 4, 2015 व निदेश दि. जुलै 21, 2015 आणि निदेश दि. नोव्हेंबर 4, 2015 सह वाचित, निदेश दि. ऑगस्ट 14, 2014 च्या कार्यकालाची वैधता, मे 17, 2016 रोजी कामकाज/व्यवहार बंद झाल्यापासून ते नोव्हेंबर 17, 2016 पर्यंत, पुनरावलोकनाच्या अटींवर आमचे सुधारित निदेश दि. मे 10, 2016 अन्वये, आणखी सहा महिन्यांसाठी वाढविण्यात आली आहे. इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही. दि. मे 10, 2016 च्या निदेशाची एक प्रत जनतेच्या माहितीसाठी वरील बँकेच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात आली आहे.

रिझर्व बँकेने वरीलप्रमाणे केलेल्या बदलाचा अर्थ, ह्या बँकेच्या आर्थिक स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली असल्याबद्दल रिझर्व बँकेचे समाधान झाले आहे असा घेतला जाऊ नये.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2015-2016/2671**